मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळ, मुंबई

एकजुटीचा वारसा, समाजसेवेचा ध्यास : प्रेरणादायी वाटचाल

“सह वीर्यं करवावहै” — आपण सर्वांनी एकत्र येऊन सामर्थ्याने व उत्साहाने कार्य करूया.

या उदात्त विचाराला कृतीची जोड देऊन समाजकार्याचा पाया रचणाऱ्या संस्थापक कार्यकारिणीला मनःपूर्वक अभिवादन! त्यांची दूरदृष्टी, समर्पण आणि सर्व समाजबांधवांचे सहकार्य यांतून घडलेली ही वाटचाल नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

1. एका विचारातून सुरू झालेला प्रेरणादायी प्रवास

1977 सालच्या मे महिन्यात शेंदुर्णी, जिल्हा जळगाव येथे **श्री दिगंबर विठ्ठल बारी** यांनी त्यांच्या वडिलांच्या श्राद्ध दिनानिमित्त महाराष्ट्रातील काही समाजकार्यकर्त्यांची सभा बोलावली होती. त्या सभेला **डोंबिवलीचे श्री पंडितराव बंडू बारी (फुसे)** व **श्री बुधो राजाराम वंडोळे** हजर होते. तेथे अकोल्यावरून प्रसिद्ध झालेला " **बारी समाज सेवक** " मासिकाचा अंक त्यांना बघायला मिळाला. त्या **अंकात गावोगावी सामाजिक मंडळ स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.** त्यापासून प्रेरणा घेऊन श्री वंडोळे तो अंक घेऊन श्री पंडितराव बंडू बारी यांच्या घरी डोंबिवलीला घेऊन आले. आणि आपणही मुंबईत एक सामाजिक मंडळ स्थापन करावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. ही कल्पना त्यावेळी मुंबईत वास्तव्यास असलेल्या काही बारी समाजबांधवांपर्यंत पोहोचली. त्यात **प्रामुख्याने श्री पंडितराव रमाजी बारी (अस्वार), श्री पांडुरंगजी झोलबाजी इंगोले, श्री हिरामण खानजोडकर, श्री जगन्नाथ ताडे, श्री पंडितराव लाला बुंदे, श्री आर. के बारी, श्री रामदास गंभीर बारी, श्री गणपतराव दातीर श्री मधुकर सोनू पाटील, श्री भगवान सोनू पाटील** या मंडळींचा समावेश होता. ही सर्व मंडळी **कल्याण ते मुंबई परिसरात राहत होती.** या सर्वांनी चर्चा करून मुंबईत आपल्या बारी समाजाचे एक मंडळ स्थापन करावे यावर सर्वांचे एकमत झाले. **मंडळ स्थापन करण्यासाठी व त्याविषयी विस्तृत चर्चा करण्यासाठी दिनांक 17/07/1977 रोजी कळवा येथे श्री पंडितराव रमाजी बारी (अस्वार)** यांच्या घरी एकत्र येऊन भेटण्याचे ठरले. त्याच दरम्यान **श्री गणपतराव के. धुळे** हे **श्री पंडितराव बंडू बारी यांना त्यांच्या ऑफिसमध्ये भेटायला आले होते.** त्यांना बारी समाज व त्याचा विकास याबद्दल विशेष आत्मीयता होती. आम्ही एक मंडळ स्थापन करण्याचा विचार करीत असल्याचे पंडितरावांनी त्यांना सांगितले व त्यासाठी कळव्याला बैठकीला येण्याचे आमंत्रण दिले. हे ऐकून श्री धुळे साहेबांना खूप आनंद झाला. व त्यांनी बैठकीस येण्याचे कबूल केले. तेव्हा जुलै महिना म्हणजे मुंबईत खूप जास्त पावसाचा महिना. त्यावेळीही धो धो पाऊस होत होता .पण एका सामाजिक मंडळाच्या ध्येयाने झपाटलेल्या या कार्यकर्त्यांनी पावसाची पर्वा न करता, बैठकीला हजेरी लावली. अशाप्रकारे **सदर पहिली सभा श्री पंडितराव रमाजी बारी (अस्वार) यांच्या घरी " गौरीशंकर " या वास्तूत पार पडली. दिनांक 17/07/1977 रोजीच्या या सभेत " मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळाची" रीतसर स्थापना करण्यात आली.** आणि मंडळाची तात्पुरती (ad hoc) कमिटी स्थापन करण्यात आली.

त्यावेळी त्या कमिटीवर निवडलेले मंडळाचे पदाधिकारी खालील प्रमाणे होते.

1. **श्री पंडितराव बंडू बारी (फुसे) – अध्यक्ष**
2. **श्री पंडितराव रमाजी बारी (अस्वार) – उपाध्यक्ष**
3. **श्री हिरामण उखर्डु खांजोडकर – सचिव**
4. **श्री जगन्नाथ खुशाल ताडे – सहसचिव**
5. **श्री बुधो राजाराम वंडोळे – खजिनदार**

अशाप्रकारे मंडळाच्या पहिल्या सभेत मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळाचे बीजारोपण झाले असे म्हणायला हरकत नाही. ते बीज अंकुरित होऊन पुढे छोटे रोपटे होऊन त्याने हळूहळू बाळसे धरले. पुढच्या येणाऱ्या प्रत्येक कार्यकारिणीने त्याची योग्य मशागत करून आणि त्याला

सुरक्षितता देऊन त्याला मोठे केले. आज जवळपास पाच दशकांच्या वाटचालीनंतर या रोपट्याचे विशाल वृक्षात झालेले रूपांतर पाहताना समाजबांधवांच्या मनात अभिमान आणि कृतज्ञतेची भावना निर्माण होते.

मंडळ स्थापन केल्यानंतर मुंबई, ठाणे, जिल्ह्यातील आपल्या बारी समाजबांधवांशी संपर्क करून पत्ते गोळा करण्याचे काम सुरू केले गेले. **सुरुवातीला एकूण सदस्य संख्या 30 होती.** सभासद संख्या वाढविणे हे मंडळासाठी आवश्यक असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा मंडळाची दुसरी सभा घेण्याचे ठरले. **ही सभा दिनांक 11/09/1977 रोजी डोंबिवलीच्या जोंधळे विद्यामंदिरात पार पडली.** या सभेचे **अध्यक्ष श्री बुधो लक्ष्मण बारी** हे होते. श्री बुधो लक्ष्मण बारी यांनी मंडळाला **51/-** रुपयाची पहिली देणगी देऊन देणगीचा श्रीगणेशा केला. ही मंडळासाठी विशेष बाब आहे. त्या औदार्यासाठी मंडळ त्यांचे सदैव ऋणी राहील. सततच्या प्रयत्नामुळे आतापर्यंत सदस्य संख्या 40 पर्यंत वाढली होती. आणखी सदस्य संख्या वाढवण्यासाठी या सभेत निर्णय घेण्यात आला की, जो कोणी आपल्या गावी जाईल त्यांनी आपल्या परिचयातील लोकांचे कोणी नातेवाईक किंवा परिचित मुंबईला राहत असतील तर त्यांचे पत्ते घेऊन यावे. जेणेकरून त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना मंडळाचे सदस्य करून घेता येईल. अशा प्रकारे सभासद संख्या वाढविण्यासाठी हरसंभव प्रयत्न करण्यात आले. मंडळ स्थापनेसाठी व **पहिली अधिकृत कार्यकारिणी निवडण्यासाठी मंडळाची तिसरी व जाहीर सभा दि. 25/11/1977 रोजी गोरेगावच्या आरे मिल्क कॉलनीच्या गार्डनमध्ये पार पडली.** त्यासाठी सर्व संपर्कातील बारी समाजबांधवांना कळविण्यात आले व या सभेला उपस्थित राहण्यासाठी विनंती करण्यात आली. **त्या सभेचे अध्यक्ष स्थान बारी समाज सेवकचे संपादक श्री लक्ष्मण हागे साहेब यांनी स्वीकारले होते.** याच सभेमध्ये मंडळाची पहिली अधिकृत कार्यकारिणी निवडण्यात आली.

मंडळाच्या पहिल्या कार्यकारिणीमध्ये एकूण 11 सदस्य होते. त्यात दोन महिला सदस्या होत्या.

1. श्री पंडितराव बंडू बारी (फुसे) – अध्यक्ष
2. श्री पांडुरंगजी झोलबाजी इंगोले – उपाध्यक्ष
3. श्री पंडितराव रमाजी बारी (अस्वार) – सचिव
4. श्री जगन्नाथ खुशाल ताडे – सहसचिव
5. श्री बुधो राजाराम वंडोळे – खजिनदार
6. श्री पंडितराव लाला बुंदे – सभासद
7. श्री ओंकार तुकाराम कोल्हे – सभासद
8. श्री अनंत दामोदर कापरे – सभासद
9. श्री तुकाराम रामभाऊ ताडे – सभासद
10. सौ. लीलाबाई भीमराव बोरकर – सभासद व अध्यक्षा, महिला मंडळ
11. डॉ. सौ. आशाताई श्रीराम बारी – सभासद व. सचिव, महिला मंडळ

सोबतच याच सभेत महिला मंडळाची सुद्धा स्थापना करण्यात आली. महिला **मंडळाच्या अध्यक्ष म्हणून सौ. लीलाबाई भीमराव बोरकर आणि सचिव म्हणून सौ. आशाताई श्रीराम बारी यांची निवड झाली.** त्यानंतर **मंडळाची चौथी सभा दि. 26/01/1978 रोजी पार पडली . ही सभा श्री नामदेवराव वसुले यांच्या अध्यक्षतेखाली झाली.** त्या सभेत मंडळाची ध्येयधोरणे तसेच कार्यकारिणीने तयार केलेल्या घटनेचे (उपविधीचे) वाचन करण्यात आले. यावर चर्चा करून मंडळाची घटना मंजूर करण्यात आली. तसेच मंडळाची मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये रीतसर नोंदणी करून घेण्याचे ठरविण्यात आले. याच सभेमध्ये महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी पहिला हळदीकुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर मात्र कार्यकारिणीची दर महिन्याला मासिक सभा घेण्यात येत होती. चर्चा, संवाद करून योग्य ते निर्णय घेतले जात होते. नाशिकच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयात अनेकवेळा नोंदणी संबंधात पत्रव्यवहार करण्यात आला. तसेच ठाणे येथील धर्मदाय आयुक्त कार्यालयात अनेकवेळा प्रत्यक्षपणे जाऊन मंडळाच्या नोंदणीसाठी

पाठपुरावा करण्यात आला. **शेवटी सर्व प्रयत्नांना यश येऊन दि. 17/11/1978 रोजी मंडळाचे मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 खाली नोंदणीकरण झाले.**

2. मंडळाची ध्येये आणि सामाजिक बांधिलकी

1. **समाजातील प्रादेशिक अंतर कमी करून परस्पर स्नेह, आदर आणि एकजूट वाढविणे.**
2. **समाजहिताला बाधा आणणाऱ्या प्रथांविषयी जागृती करून कमी खर्चाच्या व आचरण्यास सोप्या चालीरितीचा समाजात प्रसार करणे व त्यासाठी आवश्यक ते प्रबोधन करणे.**
3. **महाराष्ट्रातील बारी समाजासाठी मुंबईत किंवा ठाणे परिसरात " बारी भवन " ची निर्मिती करणे व तेथे येणाऱ्या समाजातील बांधवांसाठी योग त्या मार्गदर्शनाची व्यवस्था करणे.**
4. **समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक विकासासाठी मदत करणे.**
5. **सार्वजनिक अथवा वैयक्तिक संकट प्रसंगी समाजबांधवांना मंडळाच्या आर्थिक कुवती प्रमाणे मदत करणे.**
6. **समाजातील गुणीजनांचा मान सन्मान करणे व त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देणे.**
7. **गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिके देऊन त्यांचे कौतुक करणे व प्रोत्साहन देणे.**
8. **स्त्रियांची संघटना बांधून त्यांना मंडळाच्या कामात योग्य ते स्थान देणे.**

या सर्व कालावधीत मंडळाचे कामकाज, चर्चा, विचार विनिमय करण्यासाठी मंडळाच्या पदाधिकारी व सभासदांच्या अनेक बैठका, सभा घेण्यात आल्या. या बैठका कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांच्या घरी होत असायच्या. बहुतेक बैठका ह्या **श्री पंडितराव बंडू बारी, डोंबिवली, श्री पंडितराव रमाजी बारी, कळवा, सौ. आशाताई श्रीराम बारी, भायखळा यांच्या निवासस्थानी झालेल्या आहेत.** काही बैठका इतर सदस्यांच्या निवासस्थानी सुद्धा झालेल्या आहेत.

अशाप्रकारे एकदा मंडळ स्थापन झाल्यानंतर कार्यकारिणीने तेथेच न थांबता त्यांनी मुंबई परिसरात शिक्षण, नोकरी, व्यवसाया निमित्ताने आपले मूळ गाव सोडून आलेल्या आपल्या समाजातील लोकांशी संपर्क करत राहिले. नवीन लोकांच्या ओळखी करून घेत त्यांना आपल्या मंडळाची माहिती देऊन सभासद होण्याची विनंती करीत . लोकांकडूनही चांगला प्रतिसाद मिळत होता. आपल्यासाठी नवीन असलेल्या मुंबई परिसरात आपण एकत्र आलो, एकत्र राहिलो तर आपल्या संख्येमुळे येथे आपण आपले एक सामाजिक स्थान निर्माण करू शकतो. आपल्याला एक सामाजिक ओळख मिळू शकते. हा मोठा अप्रत्यक्ष फायदा आहे. हे लोकांना पटवण्यात आपले संस्थापक सदस्य यशस्वी झाले. त्यामुळे यादरम्यान अनेक समाजबांधव जुळत गेले. त्यामुळे कार्यकारीलाही काम करण्याचे बळ व प्रोत्साहन मिळायचे तसेच एक प्रकारचा आनंद व समाधान मिळत होते. म्हणून कधीही त्यात त्यांना कंटाळा वाटला नाही. ते लोकांना भेटत राहिले. त्याच्या परिणामी दिवसेंदिवस मंडळाच्या सभासदांची संख्या हळूहळू वाढत गेली. आज 2026 ला मंडळाच्या आजीव सभासदांची संख्या **937** इतकी आहे .

3. निधी उभारणी : जिद्द, विश्वास आणि सामूहिक प्रयत्न

कोणत्याही सामाजिक संस्थेचे कार्य सातत्याने पुढे नेण्यासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक असते. मुंबई मंडळाला सुद्धा सुरळीतपणे चालवण्यासाठी निधी लागणारच होता. तो कसा उभा करावा हा यक्षप्रश्न मंडळासमोर उभा झाला. त्यासाठी संस्थापक कार्यकारिणी सदस्यांनी ठरवले की, मंडळाचे आता जे सभासद आहेत त्या प्रत्येकाकडून मासिक 1 रुपया प्रमाणे वर्गणी घ्यावी. म्हणजे वर्षाला 12 रुपये प्रत्येक सभासदांनी मंडळाला द्यावे. यातून जो निधी गोळा होईल त्यातून मंडळाचा होणारा खर्च भागवावा. असा निर्णय झाल्यावर हा निधी गोळा करणे हे किती कठीण काम आहे ते त्यासाठी प्रयत्न केल्यावरच लक्षात आले. कारण त्यावेळी प्रत्येकाकडे फोन नव्हता. तसेच Gpay / UPI सारखे सुलभ पेमेंट साधन उपलब्ध नव्हते. त्यामुळे ही वर्गणी गोळा करण्यासाठी प्रत्यक्ष सभासदाच्या घरी जावे लागायचे. जाण्यायेण्यासाठी लागणाऱ्या गाडी भाड्याचे पैसे कार्यकारिणी सदस्याला स्वतः च्या खिशातून खर्च करावे लागायचे. कारण जर हा खर्च वर्गणीतून केला तर मंडळासाठी काय शिल्लक राहील हा

प्रश्न होता. परत एकदा जाऊन वर्गणी मिळेलच अशी शाश्वती नव्हती. कधी संबंधित व्यक्ती घरी नसायची, तर कधी पैशाची अडचण असायची. त्यामुळे परत परत जाणे पण व्हायचे. लोकांकडे त्यावेळी पैसा कमी असला तरी लोक सहकार्य करायचे व गोळा होणाऱ्या पैशातून कसाबसा मंडळाचा कारभार चालायचा. पुढे ही वर्गणी मासिक 1 रुपयावरून मासिक 2 रुपये करण्यात आली. तरीपण सुरुवातीपासून ही वर्गणी गोळा करण्यासाठी कार्यकारिणी सदस्यांना महत्प्रयास करावे लागायचे. त्यासाठी स्वतःचा वेळ व पैसा खर्ची घालावा लागत होता. हा अशी वेळखाऊ पद्धत दीर्घकाळ सुरू ठेवणे कठीण आहे हे कार्यकारिणीच्या लक्षात आले. मग यासाठी उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. कार्यकारिणी बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात आला की, यापुढे लोकांना वर्गणीसाठी आजीव सभासद होण्याचा पर्याय देण्यात यावा. त्यासाठी एकदाच 101/- रुपये वर्गणी द्यायची व आजीवन मंडळाचे सदस्यत्व घ्यायचे. मग मासिक वर्गणी द्यायची गरज नाही. ज्यांना एकदम 101/- देणे शक्य नाही ते मासिक वर्गणी चालू ठेवू शकतात. असे दोन पर्याय देण्यात आले. पुढे हा निर्णय ऐतिहासिक ठरला. या निर्णयामुळे कार्यकारिणी सदस्यांची वर्गणी गोळा करण्यासाठी होणारी पायपीट, वेळ व पैसे वाचले. पुढे काही वर्षानंतर मासिक वर्गणी हा पर्याय आपोआप संपुष्टात आला व सर्वांनी तसेच नवीन होणाऱ्या सभासदाने आजीव सभासद होण्याचा पर्याय निवडला. त्यामुळे मंडळाला थोडेफार आर्थिक स्थर्य आले. पुढे काळानुसार या आजीवन सभासद फी ची वेळोवेळी फेररचना करण्यात आली. सध्या 2026 मध्ये आजीवन सभासद फी रुपये 501 /- इतकी आहे. तरीपण मंडळ त्यावेळी आपल्या बाल्यावस्थेतच होते. गोळा होणारी वर्गणी ही तुटपूंजी असल्याने त्याद्वारे कोणतेही सामाजिक कार्य करणे, किंवा समाजबांधवांना एकत्रित आणण्यासाठी एखादे स्नेहसंमेलन आयोजित करणे, अशा कार्यक्रमासाठी होणारा खर्च त्यातून भागवणे अशक्य होते. मग समाज एकत्र कसा आणायचा यावर चर्चा विनिमय सुरू झाला. त्यातून असा मार्ग काढण्यात आला की, **आपण एखादे नाटक किंवा ऑर्केस्ट्रा प्रायोजित करायचा**. तो **कार्यक्रम बघण्यासाठी सर्व समाजबांधव एकत्र येतील. त्यानिमित्ताने एकमेकांच्या भेटीगाठी होतील, एकमेकांचा परिचय होईल. त्यामुळे आपसात संपर्क वाढतील**. अशा कार्यक्रमाच्या प्रवेशिका मंडळासाठी देणगी मूल्य लावून त्या सर्व समाजबांधवांमध्ये वितरित कराव्यात. या प्रवेशिका वितरणातून गोळा झालेल्या निधीमधून कार्यक्रमाच्या आयोजनावर झालेला खर्च वजा करता जो निधी शिल्लक राहील तो मंडळाकडे जमा होईल . त्यातून मंडळ अधिक सशक्त होईल व मंडळाचा विकास कार्ये करता येतील. असा महत्त्वपूर्ण निर्णय कार्यकारिणीने घेतला. पुढील काळात हा निर्णय मंडळाच्या आर्थिक विकासासाठी मैलाचा दगड म्हणून सिद्ध झाला. हे त्यानंतरच्या मंडळाच्या भरभराटीने सिद्ध केले. **आता मुंबईतील समाजबांधवांना एकत्र येऊण भेटिगाठीसाठी वर्षातून दोन संधी उपलब्ध झाल्या. एक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा व दुसरी मंडळाद्वारे प्रायोजित नाटक किंवा ऑर्केस्ट्रा**. ही प्रथा पुढे अनेक वर्षे सुरू होती. त्यामुळे मंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी खूप मदत झाली.

या योजनेनुसार मंडळाने पहिले प्रायोजित केलेले नाटक " **भ्रमाचा भोपळा** " हे होते. त्याला सर्व समाजबांधवांनी प्रचंड प्रतिसाद देऊन यशस्वी केले. त्यानंतर " **मोरूची मावशी** ", " **सही रे सही**" " **आसू आणि हसू** " अशी एकाहून एक गाजलेली नाटके तसेच अधून मधून काही **ऑर्केस्ट्रा,** मंडळाने दरवर्षी पेश केली. त्याला समाजबांधवांनी सुद्धा तितक्याच हिरीरीने व उत्साहाने सहकार्य करून यशस्वी केले. त्याबद्दल मंडळ सर्व समाजबांधवांचे कायम आभारी आहे.

नाटक किंवा ऑर्केस्ट्रासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांची ही परंपरा मंडळाने पुढे अनेक वर्षे जपली.

4. पहिले हक्काचे स्थान : कल्याण येथील वास्तू

सन 1989 ते 1991 या काळात श्री डी. एन. सुने हे मंडळाचे अध्यक्ष व सौ. आशाताई बारी ह्या सचिव होत्या. त्या कार्यकारिणीने आपले बारी भवनाचे स्वप्न नजीकच्या काळात पूर्ण होणे निधी अभावी शक्य नसल्याने निदान मंडळासाठी हक्काचे कार्यालय थाटण्यासाठी एखादी जागा किंवा खोली घ्यावी असा विचार मांडला. तो प्रस्ताव योग्य वाटल्याने कार्यकारिणीने त्याला मान्यता दिली. त्यानंतर त्यासाठी जागेचा शोध घेण्यात आला. अनेक पर्यायातून बिर्ला कॉलेज जवळची चाळीतील खोली कार्यकारिणीने फायनल केली . सदर खोली ही छोट्या दोन खोल्या मिळून एकूण 500 चौ. फूट चा हॉल बनवून खरेदी करण्याचे ठरले. त्याची त्यावेळी किंमत रुपये 97000 /- इतकी होती. मंडळाकडे तेव्हा इतका निधी उपलब्ध नव्हता. तेव्हा अध्यक्ष श्री डी. एन. सुने यांनी समाजाला आवाहन केले की, ही वास्तू घेण्यासाठी समाजातील ज्या बांधवांना शक्य

आहे त्या बांधवांनी मंडळाकडे प्रत्येकी रुपये 5000/- च्या बिनव्याजी ठेवी ठेवून आर्थिक सहकार्य करावे. मंडळ मुदतीनंतर त्या ठेवी संबंधित बांधवांना परत करेल. आश्चर्य म्हणजे या आवाहनाला आपल्या काही उदार बांधवांनी स्वेच्छेने प्रतिसाद देऊन प्रत्येकी रु. 5000/- च्या ठेवी मंडळाकडे ठेवल्या. अशाप्रकारे मंडळाकडील निधी आणि मिळालेल्या ठेवींच्या माध्यमातून मंडळाच्या खात्यात मंडळाची पहिली वास्तू जमा झाली. पुढे सदर ठेवीदारांनी आणखी औदार्य दाखवून मंडळाकडे ठेवलेल्या ठेवी परत न घेता त्या मंडळाला देणगी म्हणून जाहीर केल्या. त्यामुळे मंडळावर पुढे ठेवी परत करण्याचा बोजा राहिला नाही. मंडळ त्या देणगीदारांचे सदैव ऋणी आहे. ही वास्तू घेतल्यानंतर त्याचा उपयोग मंडळाने आपले अधिकृत कार्यालय म्हणून केला. तसेच तेथे मुंबईत बाहेरून येणाऱ्या समाजातील गरजू बांधवांना तात्पुरती राहण्याची परवानगी देऊन आपले समाजसेवेचे व्रत पुढे चालू ठेवले.

5. नव्या नात्यांना जोडणारा उपक्रम : मुंबईतील वधू-वर परिचय मेळावा

सन 2002 पूर्वी समाजकार्याचा एक भाग म्हणून मंडळातर्फे समाजातील विवाहोत्सुक युवक युवतींची माहिती गोळा केली जात असे. अशी माहिती गोळा करण्यासाठी त्यांचेकडून आवश्यक माहितीचा एक फॉर्म भरून घेतला जात असे. ही माहिती संकलित करून त्यामधून योग्य वधू किंवा वराच्या शोधात असलेल्या बांधवांना ती माहिती पुरविण्यात येत असे. **ही माहिती गरजू व्यक्तीला मिळणे सोपे व्हावे म्हणून माहिती गोळा करणे आणि ती ज्यांना हवी त्यांना पुरविणे ही जबाबदारी मंडळाने कल्याणचे श्री पांडुरंगजी इंगोले यांच्यावर सोपविली होती.** त्यांना अशा कामात स्वारस्य असल्याने त्यांनीही ही जबाबदारी स्वेच्छेने व समर्थपणे काही वर्ष पार पाडली. त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे मंडळाने मुंबईत 2002 साली मुंबईतील विवाहोत्सुक युवक युवतींकरिता पहिला उप वधू-वर परिचय मेळावा आयोजित केला. मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आणि उप वधू- वर परिचय मेळावा एकत्रित आयोजित करण्यात येत असे. असा **पहिला उप वधू- वर परिचय मेळावा कुर्ला येथे श्री संत गाडगेबाबा वस्तीगृहाच्या वास्तूमध्ये घेण्यात आला.** त्यानंतर नियमितपणे दरवर्षी असा उप वधू- वर परिचय मेळावा आयोजित करून मंडळाने हे सामाजिक कार्य करण्याचे व्रत निरंतर आजपर्यंत सुरु ठेवले आहे.

6. समाजसेवेला स्थैर्य देणारी ठाणे येथील वास्तू

वर्ष 2003. मंडळ स्थापन होऊन 25 वर्षे उलटून गेली होती . मंडळाचे रौप्यमहोत्सवी वर्ष सन 2002 मध्ये उत्साहात साजरे करण्यात आले होते. परंतु बारी भवनाचे आपले स्वप्न अजून पूर्ण झाले नव्हते. ते पूर्ण करण्यासाठी मंडळ कसोशीने प्रयत्न करीत होते. त्यासाठी मोठा निधी आवश्यक असल्याने ते अजूनही आवाक्याबाहेरच होते. **त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्री प्रकाश गुर्जर आणि उपाध्यक्ष श्री रामदास के. बारी हे होते.** जर बारी भवनसाठी जागा घेणे व त्यावर बारी भवन बांधणे यासाठी लागणारा मोठा निधी नजीकच्या काळात उपलब्ध होईल याची शाश्वती नसल्याने त्याऐवजी दुसरे काही करता येईल का? यावर कार्यकारिणी विचार करत होती. तेव्हा सध्या एखादा फ्लॅट घ्यावा म्हणजे मंडळाची ती स्थावर संपत्ती होईल. व जेव्हा बारी भवन उभारण्याची वेळ येईल तेव्हा आवश्यक असल्यास तो विकता येईल व त्यावेळी त्याची किंमत पण वाढलेलीच असेल. म्हणजे मंडळाचा फायदाच होईल. यावर कार्यकारिणीचे एकमत झाले आणि कार्यकारिणीने तो धाडसी निर्णय घेतला. मग अशा प्रॉपर्टीचा शोध घेतला असता ठाणे स्टेशनच्या अगदी जवळ चेंदणी कोळीवाडा येथील बिल्डिंगमध्ये दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट बुक करण्यात आला. आता कार्यकारिणीची खरी परिक्षा होती. कारण त्या फ्लॅटची किंमत सुमारे 9 लाख होती. मंडळाकडे तेव्हा एव्हढा निधी शिल्लक नव्हता. पण मागच्या अनुभवावरून कार्यकारिणीला विश्वास होता की या समाजोपयोगी कामासाठी समाजबांधवांना आवाहन केल्यास ते आपल्याला निराश करणार नाहीत. म्हणून फ्लॅट बुक केल्यानंतर लगेच कार्यकारिणी कामाला लागली . सर्व समाज बंधूंना आपापल्या इच्छेप्रमाणे शक्य होईल तेव्हढी देणगी देऊन ही वास्तू घेण्यासाठी मंडळाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. या आवाहनाला मोठ्या संख्येने सकारात्मक प्रतिसाद देऊन आपल्या दिलदार समाजबांधवांनी सुद्धा सढळ हस्ते सहकार्य करून मंडळाचा विश्वास सार्थ ठरविला. **एकूण 155 सभासदांनी त्यासाठी स्वेच्छेने मंडळाला देणग्या दिल्या . त्यातून एकूण रु. 6,89,691/- इतकी देणगी रक्कम जमा झाली. त्यामध्ये श्री पंडितराव बंडू बारी, संस्थापक व माजी अध्यक्ष यांनी रु. 1,21,111/- आणि**

श्री श्रीराम बारी, कार्यकारिणी सदस्य यांनी रु. 1,00,001/- ह्या प्रमुख देणग्या होत्या. (त्यामध्ये श्री पंडितराव बंडू बारी, संस्थापक व माजी अध्यक्ष, श्री श्रीराम बारी, श्री पंडितराव रमाजी बारी आणि श्रीमती अलका ए. काजणे हे प्रमुख देणगीदार होते. या औदार्यासाठी सर्व 155 देणगीदाराचे मंडळ शतशः आभारी आहे.) अशाप्रकारे समाजातील दानशूर देणगीदारांनी दिलेली देणगी व मंडळकडील उपलब्ध निधी मिळून ठाणे येथे रत्नदीप सोसायटी मध्ये one BHK फ्लॅट मंडळाच्या नावावर खरेदी करण्यात आला. अशाप्रकारे मंडळाच्या हातात कोणतेही नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध नसतांना सुद्धा कार्यकारिणीने अतिशय खंबीरपणे व जिद्दीने प्रयत्न करून अल्प वेळात फ्लॅटच्या निधीची जमवाजमव करून एका धाडसी निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यश मिळवले. त्यासाठी देणगीदारांना याचे महत्त्व पटवून देणे आणि त्यांना देणगी देण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे अवघड काम **उपाध्यक्ष श्री आर.के. बारी यांनी योग्य रीतीने व चिकाटीने पार पाडले.** सदर फ्लॅट ठाणे या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने व स्टेशनजवळ असल्याने त्याला अधिक महत्त्व प्राप्त झाले. आज तेथे मंडळाचे अधिकृत कार्यालय सुरू आहे. तसेच सध्या त्या ठिकाणी शिक्षण, नोकरी, किंवा इतर कामासाठी महाराष्ट्रातून आलेल्या बारी समाजाच्या गरजू व होतकरू मुलांना तात्पुरती राहण्याची सोय करण्यात आली आहे. त्याद्वारे मंडळ समाजातील गरजवंतांना मदतीचा हात देऊन त्यांच्या प्रगतीस हातभार लावत आहे.

7. डिजिटल युगातील पाऊल : www.barisamaj.com

सन 2000 पासून आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला. त्या काळात संगणक, इंटरनेट, ई-मेल आणि संकेतस्थळ यांसारखी आधुनिक संपर्कसाधने वेगाने लोकप्रिय होत होती. सर्वत्र या नव्या तंत्रज्ञानाची चर्चा होत होती. गतिमान संपर्काची ही साधने अत्यंत लोकप्रिय ठरत होती. त्यामुळे प्रत्येकालाच ती हवीहवीशी वाटत होती. प्रत्येक संस्था त्याचा वापर करून आपला जास्तीत जास्त संपर्क वाढविण्याचा प्रयत्न करीत होती. या बदलत्या काळाशी सुसंगत राहण्याचा निर्णय मंडळानेही घेतला. मंडळानेही आपली एक संकेतस्थळ असावे असा निर्णय घेतला आणि त्यावर काम सुरू केले**. मंडळाचे संकेतस्थळ बनविण्याची जबाबदारी आपल्या बारी समाजातील श्री हिमेश बारी आणि श्री राहुल गुर्जर या आय टी क्षेत्रात काम करणाऱ्या दोन तरुण युवकांनी आपल्या शिरावर घेतली.** त्यांनी परिश्रमपूर्वक अत्यंत चांगले काम करून मंडळाचे एक सुंदर संकेतस्थळ तयार केले व ती मंडळाला सुपूर्द केले. मंडळाने त्याचे 2004 साली उद्घाटन करून सर्वांसाठी संकेतस्थळ उपलब्ध करून दिले. यामुळे मंडळाची माहिती अधिकाधिक समाजबांधवांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. त्यात नंतर काळानुरूप वेळोवेळी योग्य ते बदल करून आज www.barisamaj.com ही एक अद्ययावत संकेतस्थळ सर्वांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे. प्रत्येकाने त्यावर व्हिजिट करून त्याचा लाभ अवश्य घ्यावा.

8. व्यापक सहभागाचे नवे पर्व : शेगाव वधू-वर परिचय मेळावा

मुंबईमध्ये विवाहोत्सुक युवक युवतींसाठी मंडळातर्फे उप वधू वर मेळावा 2002 पासून दरवर्षी आयोजित केला जात असे. त्याला मुंबईतील समाजबांधव चांगला प्रतिसाद देत असत. नव्या कल्पनांना सर्वांच्या सहकार्याने प्रत्यक्षात आणण्याची परंपरा मंडळाने सातत्याने जोपासली आहे. 2007 साली अशीच एक संधी चालून आली. अमरावती येथे सर्व बारी समाजाचे महाधिवेशन आयोजित करण्याची तयारी सुरू होती. त्या कार्यक्रमाचे **सचिव श्री विलासजी सातपुते व त्यांची टीम होती.** तो बारी समाजाचा पहिलाच सर्वसमावेशक कार्यक्रम असल्याने तो यशस्वी करण्यासाठी सर्व मंडळे प्रयत्नशील होती. मुंबईतून मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळ त्यांना तन-मन-धनाने मदत करण्यासाठी सरसावले. त्या वेळी मंडळाचे **अध्यक्ष कै. श्री वसंत लक्ष्मण कपले होते.** त्यांनी या अधिवेशनाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचा विडा उचलला. त्यांच्या कार्यकारिणीने महाअधिवेशनासाठी मुंबईतील आपल्या सभासदांना शक्य ती वर्गणी/ देणगी देण्याचे आवाहन केले. सभासदांनी त्याला चांगला प्रतिसाद दिल्याने सभासदांकडून देणगी गोळा करून एक रकमी रु. 1,50,000/- इतकी आर्थिक मदत देण्यात मंडळ यशस्वी झाले. तसेच सदर **महाधिवेशनाचा मुंबईत प्रचार करण्यासाठी मंडळाचे कार्यकारिणी सदस्य श्री सुरेंद्र बारी साहेब व श्री अशोक अस्वार साहेब यांनी त्या कार्यक्रमाचे पोस्टर आजच्या CST स्टेशनच्या बाहेरील झाडावर बसच्या टपावर चढून बांधले. तसेच रात्री 12 वाजता दादर रेल्वे**

स्टेशनवरील सर्व जिन्यावर पोस्टर लावणे, महाधिवेशनाचे स्टिकर चिकटवणे अशी कामे करून सहकार्य केले. मंत्रालयात येणाऱ्या महाधिवेशनाच्या पदाधिकाऱ्यांना पाठिंबा देऊन सहकार्य करणे तसेच मुंबईतील जास्तीत जास्त सभासदांना अमरावती च्या अधिवेशनात सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे ही जबाबदारी कार्यकारिणी व कार्यकर्त्यांवर सोपवण्यात आली. या सर्व जबाबदाऱ्या 2007 साली मंडळाने स्वेच्छेने आणि जबाबदारीने पार पाडल्या. **त्या अधिवेशनाला महाराष्ट्र शासनाचे उपमुख्यमंत्री कै .आर आर पाटील (आबा) आले होते.** महाअधिवेशनात बारी समाजाच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या मागण्या उपमुख्यमंत्री साहेबांसमोर मांडण्यात आल्या व त्या पूर्ण करण्यासाठी आग्रह धरण्यात आला. आपल्या मागण्या खालीलप्रमाणे होत्या.

1. बारी समाजाला अनुसूचित जाती मध्ये किंवा SBC मध्ये समाविष्ट करण्यात यावे.
2. नागवेलीचे पान व पान पिंपरीला औषधी वनस्पती चा दर्जा देऊन त्यासाठी रिसर्च सेंटरची स्थापन करावी .
3. पानाची व पिंपरीची शेती करण्यासाठी शासनाने आर्थिक मदत द्यावी.
4. महाराष्ट्रातील राजकारणात बारी समाजाला संख्येनुसार योग्य ते स्थान द्यावे .

या महाअधिवेशनाचा समाजाला सर्वात मोठा फायदा हा झाला की, या कार्यक्रमामुळे समाज एकत्रित होऊन एका व्यासपीठावर आला . समाजात एकजूट निर्माण होऊन आपण एकसंघपणे काम करू शकतो हा विश्वास समाजाला मिळाला. हा एकत्रित झालेला समाज एकत्र बांधून कसा ठेवता येईल हा विचार मुंबई मंडळ कार्यकारिणीत होऊ लागला**. मुंबई मंडळाच्या सभेत असे मत मांडण्यात आले की, आपण मुंबई प्रमाणे शेगाव येथे " उप वधू-वर परिचय मेळावा" घेतला तर मंडळाला महाराष्ट्रात व्यापी ओळख मिळेल. शेगाव हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने गावागावावरून मेळाव्यासाठी हजर होणाऱ्या उमेदवाराला व त्याच्या नातेवाईकांना ते सोयीचे होईल. समाजबांधव त्याला नक्कीच पसंत करतील. त्याद्वारे समाजसेवा होईल व सामाजिक सलोखाही वाढीस लागेल. या विषयावर विचार मंथन केल्यावर आपल्याला मुंबईवरून हे शक्य होईल का? त्यासाठी लागणाऱ्या सर्व आवश्यक बाबी, लोकांची मदत, जागा व शेगाव सारखे ठिकाण या सर्वांचा विचार करता, मुंबईवरून तेथे जाऊन कार्यक्रम यशस्वी करता येईल का यावर चर्चा, विचार विनिमय करण्यात आला.** त्यासाठी **गावोगांवची मंडळे, स्थानिक समाजकर्ते, अन्नदाते, जाहिरातदार, आश्रयदाते, यांचा पाठिंबा मिळवण्याचे प्रयत्न सुरू झाले.** योग्य तो प्रतिसाद मिळाल्यावर **मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळ व महाराष्ट्रातील इतर सामाजिक मंडळे यांच्या संयुक्त आयोजनातून 2008 साली शेगाव येथे अग्रसेन भवनमध्ये प्रायोगिक तत्वावर पहिला उप वधू वर परिचय मेळावा आयोजित करण्याचे ठरले.** त्याला समाजबांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुयोग्य नियोजन, खर्चातील काटकसर आणि विवाहेच्छुक युवक-युवतींना एकाच ठिकाणी परिचयाच्या अनेक संधी उपलब्ध झाल्यामुळे या उपक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. स्थानिक मंडळे, कार्यकर्ते, देणगीदार आणि सहभागी कुटुंबांच्या सहकार्याने हा उपक्रम अधिकाधिक समाजबांधवांपर्यंत पोहोचला. तेव्हापासून मंडळाने काळानुरूप बदल आणि नवनवीन उपक्रम राबवत शेगाव मेळाव्याच्या आयोजनाला एक उल्लेखनीय उंची प्राप्त करून दिली. त्यामुळे महाराष्ट्रासह इतर राज्यांतील अनेक समाजबांधवांसाठी हा मेळावा एक प्रेरणादायी उपक्रम ठरला आहे. आणि दरवर्षी या मेळाव्याची आतुरतेने वाट बघतात. म्हणून शेगाव मेळावा हा मुंबई मंडळासाठी यशाचा मानबिंदू ठरला आहे.

9. बारी भवनाच्या स्वप्नाकडे : फळेगाव येथील भूखंड

बारी भवनाच्या स्वप्नपूर्तीचे पहिले पाऊल – फळेगावचा भूखंड!

एक स्वप्न... अनेकांचे प्रयत्न... आणि संपूर्ण समाजाच्या एकजुटीतून साकार होणारा संकल्प!

मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळाच्या स्थापनेपासूनच **'मुंबईतील बारी भवन'** हे आपल्या समाजाचे एक महत्त्वाकांक्षी स्वप्न राहिले आहे. हे स्वप्न साकार करण्यासाठी आजवरच्या प्रत्येक कार्यकारिणीने आपापल्या परीने प्रामाणिक प्रयत्न केले. त्या सर्वांच्या प्रयत्नांतूनच आज आपण स्वप्नपूर्तीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे.

सन २००९ मध्ये मंडळाच्या **अध्यक्षपदी श्री. सुरेंद्र बारी आणि सचिवपदी श्री. अशोक मारोती अस्वार यांची निवड झाली.** याच काळात **कार्यकारिणीचा कार्यकाळ एक वर्षाऐवजी तीन वर्षांचा करण्यात आला. त्यामुळे दीर्घकालीन योजनांना गती देणे शक्य झाले.** बारी भवनासाठी स्वतःची जागा असावी, या निर्धाराने कार्यकारिणीने जागेचा शोध सुरू केला. मुंबई, ठाणे आणि कल्याण परिसरातील जमिनीचे वाढते भाव लक्षात घेऊन शिरगाव, म्हसा, सासणे, वासिंद, टिटवाळा, फळेगाव आणि रुंदे परिसरात पाहणी करण्यात आली.
याच प्रयत्नांतून **फळेगावचे मा.श्री. बंधू (अनंता) जाधव यांच्या माध्यमातून फळेगाव–खडवली रस्त्यालगतची जागा पाहण्यात आली. दिग्रसचे तत्कालीन आमदार श्री. नानासाहेब ताजने यांच्या सूचनेनुसार यवतमाळचे श्री. धर्मेंद्र गोविंदराव दुधे यांनी जागेची पाहणी करून सकारात्मक अभिप्राय दिला.**
यातूनच एक सुंदर आणि दूरदृष्टीची कल्पना पुढे आली. **समाजबांधवांना स्वतःचे भूखंड मिळावेत आणि उर्वरित जमीन बारी भवनासाठी मंडळाला विनामूल्य मिळावी!**
या दुहेरी उद्देशाने अनेक समाजबांधव एकत्र आले. बारी नागरी सेवा सहकारी संस्थेच्या माध्यमातून फळेगाव येथे सुमारे **50 एकर जमीन** खरेदी करून भूखंडांची योजना राबविण्यात आली. काही कारणांमुळे या योजनेच्या कामात मध्यंतरी खंड पडला; मात्र आता ते पुन्हा सुरू झाले असून लवकरच पूर्णत्वास जाईल, अशी आशा आहे.

या सामूहिक प्रयत्नांचे महत्त्वपूर्ण फलित म्हणजे सन 2023 मध्ये बारी नागरी सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांच्या सहकार्यातून मंडळाला बारी भवनासाठी 104 गुंठ्यांचा भूखंड मंडळाला बक्षीसपत्राद्वारे मिळाला ! आज तो पूर्ण मंडळाच्या ताब्यात आहे. हि घटना म्हणजे अनेक वर्षांच्या स्वप्नाला मिळालेला आशेचा नवा किरणच!

सन २०२२ मध्ये निवडून आलेल्या कार्यकारिणीचे अध्यक्ष श्री. अशोक मारोती अस्वार आणि सचिव श्री. सुरेश सीताराम ढगे व श्री. गजानन वामनराव केदार यांच्या कार्यकाळात भूखंडाचा सातबारा मंडळाच्या नावे करणे, शासकीय मोजणी, हद्द निश्चिती, जमीन समतलीकरण, तारकुंपण तसेच आवश्यक ग्रामपंचायत परवानग्यांची कामे करण्यात आली.

या कामांसाठी तत्कालीन अध्यक्ष श्री. अशोक अस्वार आणि खजिनदार श्री. गजानन केदार यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या चिकाटीचे आणि कार्यतत्परतेचे मनःपूर्वक कौतुक!

समृद्धी महामार्गालगत आणि फळेगाव–खडवली रस्त्याला लागून असलेला हा भूखंड भविष्यातील बारी भवनासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. जागेवर पाण्यासाठी दोन बोअरवेल करण्यात आल्या; मात्र अपेक्षित पाणी उपलब्ध झाले नाही. त्यामुळे बारी नागरी सेवा सहकारी संस्था आणि मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळ यांच्या संयुक्त सहकार्यातून **50 हजार लिटर क्षमतेची आरसीसी पाण्याची टाकी** बांधण्यात आली आहे. आता भूमिगत पाइपलाइनद्वारे हे पाणी मंडळाच्या भूखंडापर्यंत पोहोचविण्याचे काम करायचे आहे.

आता पुढचे पाऊल – स्वप्नातील बारी भवनाची प्रत्यक्ष उभारणी!

सन २०२६ मध्ये अध्यक्ष श्री. शैलेश शेषराव पायघन आणि सचिव श्री. सुरेश सीताराम ढगे यांच्या नेतृत्वाखाली नवीन कार्यकारिणी कार्यरत झाली आहे. आता भूखंडाचे अकृषक (N.A.) संदर्भातील आवश्यक काम पूर्ण करणे, बारी भवनाचा आकर्षक व उपयुक्त आराखडा तयार करणे, समाजाच्या गरजेनुसार सोयीसुविधांचे नियोजन करणे आणि बांधकामासाठी अपेक्षित निधीचा अंदाज घेणे ही पुढील महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. सर्वंकष नियोजनातून तयार झालेला प्रस्ताव समाजबांधवांसमोर ठेवला, तर आपला समाज नेहमीप्रमाणेच उदार अंतःकरणाने सहकार्य करेल, असा दृढ विश्वास आहे.

आजवरच्या सर्व कार्यकारिण्या, पदाधिकारी, कार्यकर्ते, देणगीदार आणि बारी नागरी सेवा सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांच्या योगदानातून हे पहिले पाऊल शक्य झाले आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार आणि अभिनंदन!

जागा मिळाली, पाया तयार झाला... आता उभारूया आपल्या एकजुटीचे भव्य प्रतीक – 'बारी भवन'!

''सौ की लाठी, एक का बोझा'' या म्हणीप्रमाणे प्रत्येक समाजबांधवाने आपल्या क्षमतेनुसार तन, मन आणि धनाने योगदान दिले, तर हे स्वप्न निश्चितच साकार होईल. **कारण बारी भवन ही केवळ एक वास्तू नसेल; ती असेल आपल्या समाजाच्या एकतेची, संस्कृतीची, अस्मितेची आणि भावी पिढ्यांसाठीच्या उज्ज्वल भविष्याची अभिमानास्पद ओळख! चला, सर्वांनी मिळून बारी भवनाचे स्वप्न साकार करूया!**

एक समाज... एक संकल्प... एक स्वप्न... आपले बारी भवन!

.

10. समाजहिताच्या कार्याचा विस्तृत पट

मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळाची स्थापनेपासूनची जवळपास पाच दशकांची वाटचाल हा केवळ कालक्रम नाही; ती समाजहिताची तळमळ, निःस्वार्थ सेवा, त्याग, संघर्ष, संघटनशक्ती, सामाजिक बांधिलकी, दूरदृष्टी, समता आणि बंधुभाव यांची प्रेरणादायी गाथा आहे. म्हणूनच समाज विकासाच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या या मंडळाने आपल्या स्थापनेपासून आजपर्यंत विविध उपक्रमाच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी कार्ये केली आहेत. त्या सर्वांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही. तरी त्यापैकी काहींचा उल्लेख येथे करणे संयुक्तिक ठरेल. ते खालीप्रमाणे सांगता येतील.

1. मुंबईत एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून त्याच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.
2. समाजातील विविध भागांतील बांधवांना स्नेह आणि संवादाच्या धाग्यांनी जोडणे.
3. स्त्री-पुरुषांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी महिला मंडळ स्थापन करणे.
4. समाजबांधवांना एकत्र करून त्यांच्यात सुसंवाद वाढावा, संबंध दृढ व्हावे यासाठी स्नेहसंमेलन आणि आनंदमेळावा आयोजित करणे.
5. वेगवेगळ्या विषयातील तज्ञ व्यक्तींना पाचारण करून त्यांच्या ज्ञान व विचाराच्या माध्यमातून समाजबांधवांचे प्रबोधन करणे.
6. दरवर्षी शालेय गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांना प्रोत्साहन देणे.
7. विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळालेल्या व्यक्तीचा गौरव करून त्यांचा आदर्श समाजासमोर ठेवणे.
8. समाजबांधवांशी सुसंवाद साधण्यासाठी अद्ययावत पत्ते, फोन नंबर व इतर साहित्य असलेली " आई " ही स्मरणिका दर दोन वर्षाने प्रकाशित करणे.
9. समाजातील मुलामुलींच्या सुप्त गुणांना उत्तेजन व प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करणे.
10. शिक्षण नोकरी किंवा व्यवसाय निमित्ताने मुंबईत येणाऱ्या समाजातील गरजू व होतकरू मुलांना मुंबईत तात्पुरता निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे.
11. वैद्यकीय उपचारासाठी बाहेर गावावरून येणाऱ्या रुग्णाच्या नातेवाईकाला उपचार कालावधीत राहण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.
12. कॅन्सर किंवा इतर गंभीर आजार असलेल्या गरजू रुग्णाला मंडळाला शक्य असेल ती आर्थिक व इतर मदत करणे.
13. समाजबांधवांसाठी आरोग्य तपासणी शिबिर, रक्तदान शिबिर आयोजित करणे .
14. कौटुंबिक कलह व घटस्फोटाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचलेल्या कुटुंबाची समुपदेशनाच्या माध्यमातून परत नीट घडी बसविण्यासाठी मदत करणे.
15. समाजहिताच्या दृष्टीने पुनर्विचार आवश्यक असलेल्या प्रथा व रूढींविषयी संवेदनशीलतेने प्रबोधन करणे आणि आचरणास सोप्या व कमी खर्चाच्या चालीरीतींचा प्रचार व प्रसार करणे.

16. महाराष्ट्रातील सर्व समाज मंडळांना एकत्र आणून सर्वांच्या सहकार्याने समाजाच्या प्रबोधनाचे आणि उन्नतीचे कार्य यशस्वीपणे चालू राहण्यासाठी प्रयत्न करणे.
17. समाजबांधवांना येणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मंडळातर्फे शक्य ती वैयक्तिक मदत करणे.
18. दिवसेंदिवस कठीण होत असलेला प्रश्न म्हणजे " लग्न जुळणे ". समाजासमोरील हा जटिल प्रश्न सोडविण्यासाठी शेगाव येथे, सर्व महाराष्ट्रातील व इतर राज्यातील युवक युवतींचा सहभाग असणारा उप वधू-वर परिचय मेळावा दरवर्षी आयोजित करणे. त्याद्वारे विवाहोत्सुक युवक युवतींसाठी 600 ते 700 उमेदवारांची माहिती एका परिचय पुस्तकात उपलब्ध करून देणे. इत्यादी. इत्यादी...

" एकत्र येणे हा आरंभ "

"एकत्र काम करणे ही प्रगती "

"एकत्र टिकून राहणे ही संस्कृती!!!"

हा विचार समोर ठेऊन मुंबई विभाग बारी समाज विकास मंडळाच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षी आशा व्यक्त करावीशी वाटते की, आपण एकत्र आलो आहोतच, म्हणून एकत्र काम करून प्रगती करूया आणि ही एकजूट समाजातील स्नेहबंध अधिकाधिक दृढ होत राहतील यासाठी एकत्र प्रयत्न करूया. त्यामुळेच समाजाची एक दीर्घकालीन संस्कृती व नैतिक मूल्यव्यवस्था निर्माण होतील.

सामूहिक प्रयत्नांतून घडलेला हा वारसा पुढील पिढ्यांना समाजसेवा, शिक्षण, सहकार्य आणि सद्भावनेची नवी प्रेरणा देत राहो, हीच सदिच्छा!

शुभं भवतु!